क्र.प्रविनि-२६.०८/महाराष्ट्र माहितीचा अधिकार/५१३/२००८/प्र

विमा संचालनालय
महाराष्ट्र राज्य,
गृहनिर्माण भवन, (म्हाडा),
पहिला मजला, रुम नं.२६४,
कलानगरसमोर, वांद्रे (पूर्व),
मुंबई-४०० ०५१
दिनांक १९.०६.२००८

संदर्भ : १) या कार्यालयाचा कार्यालयीन आदेश क्र. प्रविनि-२६०३/महाराष्ट्र माहितीचा अधिकार/२९२९/२००३/प्र, दि.१२.२.२००३.
२) या कार्यालयाचा कार्यालयीन आदेश क्र. प्रविनि-२६०४/महाराष्ट्र माहितीचा अधिकार/१५५८/२००४/प्र, दि.११.८.२००४
३) या कार्यालयाचा कार्यालयीन आदेश क्र.प्रविनि-२६०५/महाराष्ट्र माहितीचा अधिकार/१४०३/२००५/प्र, दि.१६.७.२००५

## कार्यालयीन आदेश

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार, अधिनियम २००५ अंतर्गत सहाय्यक माहिती अधिकारी, शासकीय माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी यांच्या नव्याने नियुक्त्या करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे यापूर्वी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ नुसार संदर्भ क्र.२ येथील दि.११.८.२००४ च्या कार्यालयीन आदेशान्वये विमा संचालनालयात नियुक्त करण्यात आलेल्या शासकीय माहिती अधिकारी व अपीलिय प्राधिकारी यात बदल करुन, केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार सुधारीत आदेश आता निर्गमित करण्यात येत आहेत.

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५(२) नुसार माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता या अधिनियमतील तरतूदी अंतर्गत नागरिकांकडून येणारे अर्ज/अपिलीय अर्ज स्विकारुन ते संबंधित शासकीय माहिती अधिकारी/शासकीय अपिलीय प्राधिकारी यांना आवश्यक कागदपत्र/माहितीसह उपलब्ध करुन देण्याकरीता, श्री. गु. सु. देवळकर, कनिष्ठ तांत्रिक अधिकारी यांना "सहाय्यक माहिती अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५(१) नुसार विमा संचालनालयामध्ये हाताळण्यात येणाऱ्या विषयांबाबतची माहिती या अधिनियमातील तरतूदींअंतर्गत नागरिकांना उपलब्ध करुन देण्याकरीता, श्री.लि.मो.खान, सहाय्यक विमा संचालक यांना "शासकीय माहिती अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ नुसार नागरिकांकडून प्राप्त होणा-या अपिल अर्जांवर कार्यवाही करण्याकरीता मा. संचालक श्री. ह. मा. देशपांडे यांना "शासकीय अपिलीय प्राधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

उपरोक्त शासकीय सहाय्यक माहिती अधिकारी, शासकीय माहिती अधिकारी व शासकीय अपिलीय प्राधिकारी यांनी केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलमांचे काटेकोरपणे पालन करावे.

(ह. मा. देशपांडे)
विमा संचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १) मा.कक्ष अधिकारी, वित्त विभाग (शासन हमी), महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर

२) मा.अवर सचिव, (प्र-२), वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर

३) मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, ९वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१ यांना माहितीसाठी सादर

३) सर्व वर्ग १ व २ चे अधिकारी

४) शासकीय सहाय्यक माहिती अधिकारी/माहिती अधिकारी/अपिलीय प्राधिकारी

५) सूचनाफलक

६) निवड नस्ती, प्रशासन.